दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि. १६ मे २०२५



**आतील पानात**

- मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन
- आई-वडिलांच्या कष्टाचं जाणलं मोल!
- पानगांकरानी चक्क रक्ताच्या सह्या करून दिले रेणापुरच्या तहसीलदारांना निवेदन


# अवैध रेतीचा धुमाकुळ बंद करा; घरकुल लाभार्थ्यांना रेती द्या, अन्यथा आंदोलन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१५, नांदेड :** बिलोली तालुक्यातील येसगी मांजरा नदी पात्रातुन खाजगी परवानगीच्या नावाखाली गेल्या काही दिवसांपासुन चालु असलेली अवैध चोरट्या रेतीचा धुमाकुळ बंद करा..अन्यथा अ.भा.भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने तिव्र आंदोलन छेडणार असल्याचे निवेदन आज दि.१५ गुरुवार रोजी तहसिलदार यांच्यासह अनेकांना देण्यात आले आहे.

तालुक्यातील येसगी येथील मांजरा नदी पात्रातुन गट क्र. २५९ या खाजगी गटातुन शासनाच्या विविध नियम व अटीच्या अधिन राहुन फक्त २७०० ब्रास रेती दि. ०९ मे. ते ०९ जुन पर्यंत उपसा व वाहतुकीस परवानगी दिली.पण त्या खाजगी परवानगीच्या नावाखाली संबधीत परवाना धारकास व महसुल विभागातील अधिकारी आणि मंडळ अधिकारी.. तलाठी यांना हाताशी धरुन सिमावर्ती तेलंगणा ,कर्नाटक व महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील रेती तस्कर अर्थिक लाचखोरीची तडजोड करुन सर्व शासकिय नियम अटी बाजुला ठेऊन गुंडागर्दीचा वापर करत सर्रासपणे सदरील मांजरा नदी घाटातुन दररोज दिवसरात्र ४ ते ५ जेसीबी मशीनच्या सहाय्याने शासकिय सर्वे नंबर असलेल्या गटातुन सर्रासपणे रात्रंदिवस हजारो ब्रास रेती उपसा करुन शेकडो हायवाच्या साहाय्याने अवैध रेतीची वाहतूक करुन आपले उखळ पांढरे करुन घेत आहेत.या लाल रेतीला वजनावर सोन्याचे भाव मिळत असल्याने रेती तस्कराचे मोठे जाळे बिलोली तालुक्यांत पसरलेले आसुन यांमुळे शासनाचा दररोज कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवला जात आहे. या अवैध रेती उपसा करणारे जेसीबी मशिन व वाहतुकीची वहाने तात्काळ ताब्यात घेऊन पंचनामा करुन तस्करांच्या मुसक्या आवळुन हि चोरटी रेती वाहतूक बंद करुन शासनाचा महसूल वाचवावा, तसेच सदर घाटावर बैठे पथकाची नियुक्ती करावी, विशेष बाब म्हणजे शासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास रेती देण्याचे आदेश असताना तांत्रिक बाब समोर करुन संबधीत महसूल विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने लाभार्थ्यांना रेती उपलब्ध होत नसल्याने घरकुलाचे बांधकाम प्रलंबित असुन लाभार्थी मात्र रेतीसाठी तहसिल कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत यासाठी महसूल प्रशासनाने तात्काळ लक्ष घालुन ही अवैध चोरटी रेती बंद करुन घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ रेती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या वतीने तहसिल कार्यालयासमोर दि. २० मे रोजी न्यायीक मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वरे आज दि. १५ मे.रोजी तहसिलदार गजानन शिंदे यांना देण्यात आले

याबरोबर क्रांती ढोबे उपविभागीय अधिकारी बिलोली पो.नि. अतुल भोसले यांच्यासह अनेकांना निवेदनाच्या प्रति देण्यात आल्या असून सदर निवेदनावर राष्ट्रीय सरचिटणीस राजु पा. शिंपाळकर जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे सो.मिडीया जिल्हाध्यक्ष सय्यद रियाज संभाजी नरवाडे जिल्हा ससरचिटणीस गंगाधर शिंदे तालुकाध्यक्ष , सुनिल जेठे ता.उपाध्यक्ष, ईश्वर जाहुरे ता.सरचिटणीस, आत्माराम पा. हानिप ईनामदार आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

## थोडक्यात

### पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ कल्याण यांची उत्कृष्ट कामगिरी



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

दि.१५, ठाणे : मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या निर्देशांन्वये १०० दिवसाची कार्यालयीन सुधारणा मोहीम दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी ते १६ एप्रिल २०२५ रोजी या कालावधीत पोलीस आयुक्त ठाणे शहर घटकात राबविण्यात आली होती. सदर कार्यक्रमामध्ये प्रमाणपत्राचे वाटप पोलीस आयुक्त, ठाणे शहर आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते दिनांक १५ मे २०२५ रोजी पोलीस उपायुक्त कार्यालय स्तरावर अतुल उत्तमराव झेंडे परिमंडळ ३ कल्याण यांना पहिला क्रमांक, सहायक पोलीस आयुक्त स्तरावर सुहास हेमाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग यांना प्रथम क्रमांक तसेच कल्याणजी घेटे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण विभाग यांना तृतीय क्रमांक आणि

पोलीस स्टेशन स्तरावर परिमंडळ ३ कल्याण मधील विजय कादबाने मानपाडा पोलीस ठाणे यांना द्वितीय क्रमांक असे प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### कल्याण पश्चिम येथे डीवायडरचा अडथळा; बसेस अडकून वाहतूक कोंडी, प्रवाशांचा संताप



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, कल्याण (ठाणे) :** कल्याण पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात अवजड वाहनांना प्रवेशबंदी घालण्यासाठी रस्त्यांवर मोठमोठे काँक्रीट डीवायडर बसवण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या निर्णयामुळे जरी अवजड वाहनांची वाहतूक आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न होत असला, तरी प्रत्यक्षात यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. डीवायडरमुळे मोठ्या बसेसना रस्ता पार करताना अडथळा निर्माण होत आहे. अनेक वेळा या बसेस या अरुंद जागेत अडकून पडतात, परिणामी संपूर्ण रस्त्यावर वाहतूक ठप्प होते. अशा परिस्थितीत शेकडो प्रवाशांना उशीर होतो, बसमधून उतरून चालत जाण्याची वेळ येते आणि उष्म्यामुळे त्रस्त होतात. हा प्रकार अनेकदा घडत असला तरी वाहतूक विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. ना डीवायडरची योग्य मोजमापाने रचना करण्यात आली आहे, ना वाहतूक नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिक यांच्यात नाराजी वाढत आहे.

**नागरिकांची मागणी – त्वरित उपाययोजना करा:**

स्थानिक रहिवाशांनी आणि प्रवाशांनी दैनिक अक्षराज तर्फे प्रशासनाकडे विनंती केली आहे की, डीवायडरचे नियोजन योग्य प्रकारे करावे, जेणेकरून वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही आणि प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागणार नाही. या समस्येवर त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे. कल्याण परिसरात वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वाहतूक दाटीमुळे आधीच अडचणी वाढल्या आहेत. अशा वेळी योग्य नियोजन न झाल्यास परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.

### अभियोग्यता चाचणीसाठीच्या नोंदणीची मुदत संपुष्टात किती उमेदवारांनी केली नोंदणी?


■ पुणे : प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक भरतीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे तीन वर्षांच्या खंडानंतर अभियोग्यता आणि बुद्धिमापन चाचणी घेतली जाणार आहे. या चाचणीसाठी राज्यभरातील २ लाख ३६,५९१ उमेदवारांनी नोंदणी केल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित शाळांतील शिक्षक भरती पवित्र प्रणालीमार्फत केली जाते. त्यासाठी अभियोग्यता आणि बुद्धिमापन चाचणी घेण्यात येते. ही चाचणी संगणकीय पद्धतीने घेण्याचे नियोजन परीक्षा परिषदेने केले आहे. या चाचणीचे अर्ज भरण्यासाठी परीक्षा परिषदेने आधी २६ एप्रिल ते १० मेपर्यंतची मुदत दिली होती. त्यानंतर ती १४ मेपर्यंत वाढवण्यात आली. परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलेल्या मुदतीमध्ये २ लाख ३६ हजार ५९१ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. अभियोग्यता आणि बुद्धिमापन चाचणी ही परीक्षा उमेदवारांना मराठी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमातून देता येणार आहे.

# शिवरस्ता मोकळा करा अन्यथा आमरण उपोषण - समाजसेविका सुनिता भांड

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१५, लोणार (बुलडाणा) : लोणार तहसील अंतर्गत बीबी व मांडवा या शिवरस्ता शंभर दिवसाच्या कृती आराखडा मधून रस्ता मोकळा करावा अन्यथा दिनांक २० मे रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा त्यांच्या कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा येथील समाजसेविका सुनिता भांड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदनाद्वरे देण्यात आला. याबाबत सविस्तर माहिती असे की, निवेदनात नमूद असे की मौजे बीबी आणि मांडवा येथील २० ते २५ शेतकऱ्यासह वरिष्ठांना या शिव रस्ता व शिव सरळ करण्यासाठी निवेदना वर साक्ष दिले असून या निवेदनामध्ये मांडवा बीबी असा शिव रस्ता आहे हा रस्ता नागमोडी सारखा झालेला आहे. शासनाने नियमानुसार हा रस्ता ३३ फूट रुंदीचा आहे परंतु त्या रस्त्यावर काही शेतकऱ्यांनी अतिक्रम केल्यामुळे अवघा ७ फुटाचा रस्ता शेतकऱ्यांच्या वहिवाटी साठी बाकी आहे. शेतकरी गेल्या पन्नास वर्षापासून हा रस्ता शासनाच्या रेकॉर्डवर आहे. तेवढा खुला करून घेण्यासाठी झटत आहेत. परंतु काही शेतकरी याला विरोध करून वाद घडून आणण्याचा प्रयत्न करत आहे आणि रस्ता खुला करण्यास अडथळा निर्माण करत आहे. या अगोदर लोणार तहसील कार्यालय यांना शिव रस्ता खुला करून देण्यासाठी विनंती अर्ज सादर केला होता. आमच्या अर्ज ची दखल घेऊन दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी आणि ९ मे २०२५ रोजी तहसील कार्यालयाचे संबंधित सर्व अधिकारी शिव रस्त्यावर रस्ता खुला दुरुस्त करण्यासाठी आले



होते,परंतु भूमी अभिलेख चे संबंधित अधिकारी गैरहजर असल्यामुळे आम्हाला रस्ता खुला करून देण्यात आला नाही. कारण काही शेतकऱ्यांनी वाद घातल्यामुळे हा रस्ता खुला करण्यासाठी भूमी अभिलेख आल्याशिवाय आम्ही काही करू शकत नाही असे तहसील व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले भूमी अभिलेख वाल्यांनी तहसील कार्यालयाचे दोन वेळेस पत्र व्यवहार करून सुद्धा जाणून बुजून हेतूपूर्वक भूमि अभिलेख कर्मचारी हजर राहिले नाही परंतु या शंभर दिवसाच्या कृती आराखड्यामध्ये आम्हाला जर शिव रस्ता दिनांक १९ मे २०२५ पर्यंत खुला करून दिला नाही तर आम्ही दिनांक २० मे २०२५ पासून जिल्हाधिकारी बुलढाणा येथे आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सौ. भांड यांनी वरिष्ठांना निवेदनडरे देण्यात आला. प्रतिलिपी मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री,महसूल राज्यमंत्री महाराष्ट्र,जिल्हाधिकारी बुलढाणा, पोलीस अधीक्षक बुलढाणा व लोणार तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

# हज यात्रेकरूंना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाने सज्ज रहावे - विभागीय आयुक्त बिदरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, नागपूर :** विदर्भासहित महाराष्ट्र, छत्तीसगड आणि बिहार येथून २३ ते ३० मे दरम्यान नागपूर येथून हज यात्रेसाठी २१०८ यात्रेकरू प्रस्थान करणार असून या यात्रेकरुंना प्राधान्याने आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध विभाग प्रमुखांना सोपविलेली जबाबदारी वेळेत व चोखपणे पूर्ण करण्याचे निर्देश, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली'हज यात्रा २०२५' सुविधा संबंधी आढावा बैठक झाली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त तेजूसिंग पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, महाराष्ट्र राज्य हज समितीचे अध्यक्ष असिफ खान, संचालक सलिम बागवान व समितीच्या कार्यकारी अधिकारी मेघना शिंदे यांच्यासह पोलीस प्रशासन, महानगरपालिका, विमानतळ प्रशासन, वाहतूक शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्टेट बँक ऑफ इंडिया,



एअर इंडिया आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाहून हज यात्रेसाठी दिनांक २३ मे ते ३० मे जून २०२५ दरम्यान महाराष्ट्रातील १५२१ यात्रेकरूंसह छत्तीसगड आणि बिहार येथील ५८७ असे एकूण २१०८ हज यात्रेकरु प्रस्थान करणार आहेत. हे यात्रेकरू ३० जुन ते ३ जुलै २०२५ दरम्यान हज यात्रेवरुन परतणार आहेत. या दरम्यान यात्रेकरुंची शहरातील 'हज हाऊस' येथे निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे

'हज हाऊस' येथे यात्रेकरुंसाठी उभारण्यात येणारे विविध मदत कक्ष, विमानतळावर पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सुविधा तसेच विमानतळावरील मदत कक्षांच्या तयारीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. यात्रेकरुंचा 'हज हाऊस' येथील वास्तव्य तसेच विमानतळ परिसरातील व्यवस्था याबाबत संबंधित शासकीय यंत्रणांनी पुरवावयाच्या सुविधा व व्यवस्थेबाबत गतीने कार्य करावे व उत्तमोत्तम सोईसुविधा उपलब्ध करुन द्याव्या,अशा सूचना यावेळी श्रीमती बिदरी यांनी दिल्या.

## संपादकीय

## बांगलादेशच्या माजी राष्ट्रपतींचं मध्यरात्री पलायन

बांगलादेशमधील परिस्थिती अजूनही सामान्य झालेली नाही. बांगलादेशात अजूनही राजकीय गोंधळ सुरू आहे. गेल्या वर्षी माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरोधात झालेल्या मोठ्या निदर्शनांमध्ये निदर्शकांवर झालेल्या हिंसक कारवाईत माजी राष्ट्रपती मोहम्मद अब्दुल हमीद यांचा सहभाग असल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. त्या अंतर्गत त्यांची चौकशीही सुरू आहे; मात्र, आता ते अत्यंत नाट्यमय पद्धतीने देश सोडून पळून गेल्याचे वृत्त समोर आले आहे.

गेल्या गुरुवारी (८ मे) माजी राष्ट्रपती मोहम्मद अब्दुल हमीद अतिशय घाईघाईने देशातून निघून गेले. प्राप्त माहितीत असे म्हटले आहे की, मोहम्मद अब्दुल हमीद रात्रीच्या अंधारात शांतपणे देशाबाहेर पळून गेले आणि मुख्य म्हणजे ते लुंगीवरच देशातून पळाले. मात्र, त्यांनी अचानक पळून जाण्याचे कारण काय? कोण आहेत मोहम्मद अब्दुल हमीद? जाणून घेऊ

मोहम्मद अब्दुल हमीद कोण आहेत?

मोहम्मद अब्दुल हमीद यांचा देशाच्या राजकारणात १९५९ पासूनचा मोठा इतिहास राहिला आहे. मोहम्मद अब्दुल हमीद यांनी १९६९ साली अवामी लीगमध्ये सामील होत, त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्याच्या एका वर्षानंतर ते मैमनसिंग–१८ मतदारसंघातून संसदीय सदस्य म्हणून निवडून आले. मोहम्मद अब्दुल हमीद हे त्यांच्या साधेपणा आणि विनोदी भाषणांसाठी ओळखले जायचे. मुख्य म्हणजे त्यांना २०१३ ते २०२३ पर्यंत सलग दोनदा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करीत देशाच्या इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होण्याचा मान मिळाला आहे.

गेल्या ऑगस्टमध्ये बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना या देशातून पळून गेल्यानंतर किशोरगंज सदर पोलीस ठाण्यात एका खून खटल्यात मोहम्मद अब्दुल हमीद यांचे नाव आरोपी म्हणून समोर आले. या खटल्यास मोहम्मद अब्दुल हमीद यांच्यासह शेख हसीना, त्यांची बहीण शेख रेहाना, त्यांचा मुलगा सजीब वाजेद जॉय व मुलगी सायमा वाजेद पुतुल यांच्या नावाचादेखील समावेश आहे. २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनादरम्यान निदर्शकांवर केलेल्या कारवाईदरम्यान झालेल्या हिंसाचारासाठीदेखील त्यांची चौकशी सुरू आहे. फेब्रुवारीमध्ये संतप्त जमावाने बुलडोझरने पाडलेल्या घरांमध्ये हमीद यांच्या घराचाही समावेश होता. बांगलादेशमधील अंतरिम युनूस सरकारने दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत शेख हसीना यांच्या अवामी लीगवर बंदी घातल्यापासून बांगलादेशात राजकीय गोंधळ वाढत असल्याकहे चित्र आहे. याचदरम्यान हमीद यांनी गुरुवारी पहाटे हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थाई एअरवेजच्या विमानाने बांगलादेश सोडला. त्यांनी त्यांचा धाकटा मुलगा रियाद अहमद आणि त्यांचा मेव्हणा नौशाद खान यांच्याबरोबर वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असल्याचे सांगून देशातून पळ काढला आहे.

## समज आणि गैरसमज

जीवन आहे खूप सुंदर
हा मोठा गैरसमज
जीवन आहे क्षणभंगुर
हा आपला खरा समज

माणसं सगळे चांगली
हा आपला गैरसमज
वाईटांचा सुळसुळाट
हा रास्त आहे समज

धावतात नातलग
मदतीला
हा ही मोठा गैरसमज
सगळे स्वार्थाचे धनी
हा सर्वांचाच समज

चांगल्या लोकांचं चांगलं
होतं
हा तर फार मोठा
गैरसमज
वाईटांचे नशीब
फळफळते
हा मात्र खरा समज


माणूस कर्माने श्रेष्ठ
बनतो
हा पूर्वापार गैरसमज
जाती साठी माती खावी
हा जातीबद्दलचा समज

पैसा आहे तर सगळं
आहे
हा सुद्धा गोड गैरसमज
जोडलेली माणसे कामी
येतात
हाच खरा आपला समज

समज आणि गैरसमज
यावर डोलारा उभारला
गैरसमज वरचढ झाले
समज बिच्चारे मागे
पडले

**- बबन दामोदर गुळवे**
**ता.अहमदपूर, जि.लातूर**
**मो.९५४५४४२६४८.**

# रंगांचे रंग मानसशास्त्र



रंगांचे रंग मानसशास्त्र म्हणजे मानवी वर्तनाचे निर्धारक म्हणून रंग आणि रंगछटांचा अभ्यास . रंग स्पष्ट नसलेल्या धारणांवर प्रभाव पाडतो, जसे की अन्नाची चव. रंगांमध्ये असे गुण असतात जे लोकांमध्ये विशिष्ट भावना निर्माण करू शकतात. वय, लिंग आणि संस्कृतीनुसार रंग व्यक्तींवर कसा प्रभाव पाडतो हे वेगळे असू शकते. जरी रंगांचे संबंध संस्कृतीनुसार संदर्भानुसार बदलू शकतात,

तुम्हाला आवडत्या रंगांच्या मानसशास्त्राबद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

प्रत्येकाचा एक आवडता रंग असतो किंवा वेगवेगळ्या परिस्थितीत अनेक आवडता रंग काम करतात. संपूर्ण जग, अगदी निसर्ग देखील रंगाच्या पसंतीवर अवलंबून असतो.

रंगांचा आपल्यावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास ते करते. रंग आपली धारणा बदलू शकतात, आपल्या संवेदना बदलू शकतात, आपल्याला भावनिक बनवू शकतात, आपली स्मरणशक्ती आणि लक्ष सुधारू शकतात आणि आपल्या निर्णयांवर देखील प्रभाव टाकू शकतात. रंगांचा प्रभाव एखाद्या विशिष्ट जागेबद्दल किंवा घटकाबद्दलची आपली कल्पना पूर्णपणे बदलू शकतो. रंग आपल्या स्मृतीशी संवाद साधतात, भावना जागृत करतात आणि तर्कशक्तीला मार्गदर्शन करतात आणि आपण रंगांशी विकसित होणारे संबंध आपल्या मेंदूचा वेळ वाचवतात कारण ते नकळतपणे प्रक्रिया केले जातात. मानव दृश्य प्राणी आहेत -- खरं तर, दृश्यमान रंग आपण काय आणि कसे विचार करतो यावर प्रभाव पाडण्यात खूप मोठी भूमिका बजावतो. रंग मानसशास्त्र हे संशोधनाचे एक क्षेत्र आहे जे रंग आपल्या वर्तनावर आणि निर्णय घेण्यावर कसा प्रभाव पाडतो हे पाहते. चार मानसिक प्राथमिक रंग आहेत - लाल, निळा, पिवळा आणि हिरवा. ते अनुक्रमे शरीर, मन, भावना आणि या तिघांमधील आवश्यक संतुलनाशी संबंधित आहेत. अकरा मूलभूत रंगांचे मानसिक गुणधर्म खालीलप्रमाणे आहेत रंगांचे सकारात्मक परिणाम कसे वापरायचे ते जाणून घ्या. काळा रंग बहुतेक लोक काळ्या रंगाला अंधाराशी किंवा कधीकधी वाईटाशी जोडतात, याउलट, काळा रंग शक्ती, कल्पकता, सुंदरता आणि लैंगिकता देखील दर्शवू शकतो. परिणामी, काळा हा एक रंग आहे जो एखाद्या व्यक्तीच्या गूढ, दूरच्या किंवा स्वतंत्र स्वभावाचे दर्शन घडवण्यासाठी वारंवार वापरला जातो. पांढऱ्या रंगाचे प्रतीकात्मक रूप म्हणजे देवभक्ती, जन्म आणि निष्पापपणा, हे रंग ज्यांना आवडतो त्यांना माहिती असेल. पांढऱ्या रंगाची आवड असणे किंवा फक्त पांढऱ्या रंगावर प्रेम करणे हे दर्शवू शकते की तुम्हीसुव्यवस्थित, स्वावलंबी आणि समजूतदार आहात. कारण ते नम्र आणि तेजस्वी आहे, त्यामुळे पांढऱ्या रंगात एक अतिशय स्वच्छ वातावरण आहे. जर तुम्हाला पांढरा रंग आवडत असेल तर तुम्ही कदाचित खूप नीटनेटके आणि शिस्तबद्ध आहात. लाल रंग धोका किंवा हिंसाचार व्यक्त करण्यात प्रचलित असण्याचे वैज्ञानिक कारण वगळता, ते इच्छेच्या रंगासाठी देखील ओळखले जाते. म्हणूनच, जर लाल रंग तुमचा आवडता रंग असेल तर तुम्ही प्रेरित, साहसी आणि सक्रिय आहात. बरेच जण त्यांच्या चित्रांमध्ये, व्यंगचित्रांमध्ये किंवा भयपट ॲनिमेशनमध्ये उग्र किंवा द्वेषपूर्ण प्रभाव देण्यासाठी लाल रंग वापरतात. व्हॅलेंटाईन डेशी त्याचा संबंध विसरू नका आणि म्हणूनच काहींसाठी तो प्रेमाचे प्रतीक असू शकतो. जांभळा रंग

तुम्हाला माहिती आहे का की प्राचीन काळी फक्त राजेच जांभळे रंग घालू शकत होते कारण ते खूप दुर्मिळ आणि महाग होते? त्याच्या राजेशाही उत्पत्तीमुळे, जांभळा रंग एखाद्याचे व्यक्तिमत्व व्यक्त करण्यासाठी वापरला जाऊ शकतो आणि म्हणूनच जांभळ्या रंगाचे वेड असलेले लोक सामान्यतः अद्वितीय असतात आणि त्यांना वेगळे दिसू इच्छितात. गुलाबी रंग हा केवळ स्त्रीलिंगी रंग नाही तर तो मुळात प्रेमाचा रंग आहे. 'आरोग्याचा गुलाबी' या वाक्यांशावरून तुम्हाला आरोग्यामध्ये या रंगाचे महत्त्व कळू शकते. जगाला हे दाखवण्यासाठी की एखादी व्यक्ती आपल्यावर विश्वास ठेवते आणि आपल्याला निःशर्त प्रेम करायचे आहे किंवा समाजाने स्वीकारायचे आहे, गुलाबी रंगाचा वापर केला जातो. जर गुलाबी रंग तुमचा आवडता रंग असेल, तर तुम्ही मनाने रोमँटिक असाल आणि कदाचित अधिक प्रेमळ किंवा उत्तेजित असाल. निळा रंग शांतता आणि शांतता दर्शविणारा आवडता रंग तुमच्या घराच्या सजावटीसाठी, आतील भागात किंवा रंगकामासाठी सामान्य असू शकतो. जर निळा तुमचा आवडता रंग असेल, तर तुम्ही निश्चितच 'जगा आणि जगू द्या' या विचारसरणीचे अनुयायी आहात. काळजी करू नका कारण तुमचे मित्रमंडळ तुम्हाला एकात्मता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देणारी एक विश्वासार्ह आणि सच्ची मनाची व्यक्ती शोधत असेल.

हिरवा रंग निसर्गाची प्रमुख संकल्पना हिरवी आहे, तर हिरवा रंग हे मत्सर आणि लोभाचे देखील एक विशिष्ट प्रतीक आहे. जर हिरवा रंग तुमचा प्रकार असेल तर तुम्ही इतरांसाठी समर्पित आहात, जरी तुम्ही अहंकारी किंवा व्यस्त किंवा तुमच्या प्रतिमेबद्दल जागरूक असाल. पिवळा भगवान विष्णूंचा पोशाख नेहमीच पिवळा असतो कारण तो त्यांच्या ज्ञानाचे प्रतीक असतो आणि म्हणूनच हिंदू प्रथा आणि प्रार्थनांमध्ये पिवळा रंग प्रबळ असल्याचे दिसून येते. हा रंग आनंदाचे आणि अत्यंत सक्रिय स्वभावाचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. जर पिवळा तुमचा आवडता रंग असेल तर तुम्ही तुमच्या व्यक्तिमत्त्वावर उत्तम प्रकारे प्रकाश टाकणारा आहात. राखाडी रंग जेव्हा तुम्ही कोणतेही सॉनेट किंवा कविता वाचता तेव्हा तुम्हाला राखाडी रंगात शोकग्रस्त शब्द नक्कीच दिसतात आणि म्हणूनच तो निराशा आणि दुःखाचा रंग म्हणून ओळखला जातो. जर राखाडी तुमचा आवडता रंग असेल तर तुम्ही अडचणीसारख्या परिस्थितीत असाल. तथापि, आधुनिक काळातील आतील भागात स्टायलिश टच देण्यासाठी राखाडी रंग प्रचलित झाला आहे.

तपकिरी रंग मातीचा आणि सेंद्रिय रंग पृथ्वी किंवा निसर्गाचे चित्रण करण्यासाठी देखील वापरला जाऊ शकतो परंतु जर तुम्हाला तपकिरी रंग आवडतो तर तुम्ही तुमच्या जीवनात स्थिरतेला महत्त्व देणारे आहात.

जरी या वैद्यकीय फायद्यांबद्दल अजूनही प्रश्नचिन्ह असले तरी, रंगामुळे मानवांमध्ये आणि काही प्राण्यांमध्ये निश्चित शारीरिक आणि भावनिक प्रतिक्रिया निर्माण होतात हे दिसून आले आहे. पांढऱ्या किंवा ''थंड'' रंगांच्या हलक्या छटा असलेल्या खोल्या आणि वस्तू तीव्र गडद किंवा ''उबदार'' रंगांपेक्षा मोठ्या दिसू शकतात; काळ्या किंवा खूप गडद रंगांचा पातळपणा किंवा आकुंचन पावणारा प्रभाव असतो, जसे की डिझाइनर आणि सजावटकारांना सुप्रसिद्ध आहे. फिकट निळ्या रंगात सजवलेल्या ''थंड'' खोलीला उबदारपणाची समान भावना प्राप्त करण्यासाठी ''उबदार'' खोलीपेक्षा जास्त थर्मोस्टेंट सेटिंग आवश्यक असते. विशेष प्रकाशामुळे निर्माण होणाऱ्या असामान्य रंगांचे प्रदर्शन पाहणाऱ्या लोकांना डोकेदुखी आणि चिंताग्रस्त विकारांचा अनुभव येऊ शकतो; अशा परिस्थितीत दिले जाणारे चवदार पौष्टिक अन्न घृणास्पद दिसते आणि आजारपण देखील निर्माण करू शकते. काही रंग निरीक्षकामध्ये आनंदाची भावना निर्माण करतात. जेव्हा सकारात्मक किंवा आनंददायीपणे जाणवलेला रंग कमी–आनंददायी रंगानंतर पाहिला जातो तेव्हा तो स्वतःहून पाहिल्यापेक्षा जास्त आनंद निर्माण करतो, ज्याला भावनिक कॉन्ट्रास्ट एन्हांसमेंट म्हणतात. रंगांच्या संयोजनाचा निरीक्षकावर होणारा परिणाम केवळ रंगांच्या वैयक्तिक परिणामांवरच अवलंबून नाही तर एकत्रित रंगांच्या सुसंवादावर आणि नमुन्याच्या रचनेवर देखील अवलंबून असतो. कलाकार आणि डिझायनर शतकानुशतके रंगांच्या परिणामांचा अभ्यास करत आहेत आणि रंगांच्या वापरावर अनेक सिद्धांत विकसित केले आहेत. या सिद्धांतांची संख्या आणि विविधता दर्शवते की कोणतेही सार्वत्रिकरित्या स्वीकारलेले नियम लागू होत नाहीत; रंगाची धारणा वैयक्तिक अनुभवावर अवलंबून असते.

रंगांच्या संयोजनाचा निरीक्षकावर होणारा परिणाम केवळ रंगांच्या वैयक्तिक परिणामांवरच अवलंबून नाही तर एकत्रित रंगांच्या सुसंवादावर आणि नमुन्याच्या रचनेवर देखील अवलंबून असतो.

**श्रीराम सा. महाजन**
**कलाशिक्षक**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल,**
**चेंबूर. मुंबई ७१**

# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन

मुलांनी फक्त पुस्तकांपुरते मर्यादित न राहता मनाने समाधानी, शांत, समृद्ध आणि मूल्य जपणारी बनावे, यासाठी पालकांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. मुलांची जडणघडण ही साचेबंद पद्धतीने न करता नवीन आणि सर्जनशील मार्गांनी कशी करता येईल, हे आपण या लेखातून जाणून घेणार आहोत. सुट्टीचा सदुपयोगः मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन

नुकतीच परीक्षा संपून शाळांना सुट्टी लागली आहे. हा वेळ केवळ आराम करण्याचा नाही, तर नवीन कौशल्ये शिकून स्वतःला विकसित करण्याचा असतो. मुलं फक्त पुस्तकात रमणारी नसावीत, तर ती मनाने समाधानी, शांत, समृद्ध आणि मूल्य जपणारी असावीत. यासाठी पालकांनी विशेष प्रयत्न करायला हवेत. मुलांची जडणघडण करताना पारंपरिक शिक्षणाच्या साच्यात अडकण्याऐवजी, नवीन संधी शोधण्याची आणि वेगवेगळ्या उपक्रमांत सहभाग घेण्याची संधी देणे गरजेचे आहे. उन्हाळी सुट्टीत मुलांनी निसर्गाशी जोडले जाणे, कला व क्रीडा क्षेत्रात रस घेणे, हस्तकला आणि प्रयोगशील उपक्रम शिकणे यांसारख्या गोष्टी त्यांना समृद्ध अनुभव देतील. मैदानी खेळ, सायकलिंग, पोहणे यांसारख्या शारीरिक क्रियाकलापांमुळे त्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल. याशिवाय, सुट्टीच्या काळात मुलांनी चित्रकला, हस्तकला, संगीत, नृत्य, शैक्षणिक सहली, शिबिरे आणि विविध छंद जोपासण्यावर भर द्यावा. कुटुंबासोबत वेळ घालवून नवीन गोष्टी शिकणे, पुस्तके वाचणे, विचारशक्ती वाढवणाऱ्या खेळांमध्ये भाग घेणे हे मानसिक विकासासाठी महत्त्वाचे ठरेल. सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी वृद्धाश्रम, अनाथाश्रम यांसारख्या ठिकाणी जाऊन सेवा करणे, पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे यामुळे मुलांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल... सुट्टीतील या उपक्रमांमुळे मुलांना केवळशिक्षणच नव्हे, तर आयुष्याचे विविध पैलू समजून घेता येतात. त्यामुळे परीक्षेच्या तणावानंतर सुट्टीचा योग्य वापर करून त्यांना आनंददायी, क्रियाशील आणि सशक्त भविष्याकडे घेऊन जाणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. परीक्षा संपल्यानंतर सुट्टी हा फक्त आराम करण्याचा काळ नसून, स्वतःला नव्या गोष्टी शिकवण्याची आणि व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची उत्तम संधी असते. खालील काही गोष्टींचा समावेश केल्यास ही सुट्टी अधिक उपयुक्त ठरेल. १. व्यायाम⁕ सकस आरोग्यासाठी दररोज व्यायाम करावा. योगा, ध्यानधारणा आणि प्राणायामाचे नियमित पालन करावे. सायकलिंग, पोहणे किंवा धावणे यासारख्या खेळांमध्ये भाग घ्यावा. २. चित्रकला⁕ आपल्या कल्पनाशक्तीला



वाव देण्यासाठी विविध प्रकारच्या चित्रकलेचा सराव करावा. जलरंग, ॲक्रेलिक, स्केचिंग, स्टिपलिंग यांसारख्या माध्यमांचा अभ्यास करावा. जर शक्य असेल, तर एखाद्या आर्ट वर्कशॉपला जॉईन करावे.

३. हस्तकला⁕ कागदी कलाकुसर (ऑरिगामी), राख्या बनवणे, ज्वेलरी डिझाइन यासारख्या क्रियाकलापांमध्ये सहभागी व्हावे. बेस्ट आउट ऑफ वेस्ट प्रकल्प बनवून कल्पकता वाढवावी. घरातील सजावटीसाठी हस्तकलेचा उपयोग करावा. ४. विविध खेळ घराबाहेर जाऊन मैदानी खेळ (क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, खो–खो) खेळावेत. बुद्धिबळ, कॅरम, सुडोकू यासारखे बौद्धिक खेळ खेळावेत. संघभावना आणि नेतृत्वगुण वाढवण्यासाठी टीम गेम्स खेळावेत. ५. संग्रह⁕ (कलेक्शन) नाणे, पोस्टल स्टॅम्प, दुर्मिळ पुस्तके, विविध पाने व फुले यांचा संग्रह करावा. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वस्तूंचा अभ्यास करून माहिती मिळवावी. या संग्रहाबाबत मित्रमैत्रिणींशी चर्चा करून नव्या गोष्टी शिकाव्यात. ६. निसर्गाची ओळख⁕ पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारावी. झाडे लावणे, घरच्या बागेत रोपांची निगा राखणे यासारख्या उपक्रमांत भाग घ्यावा. निसर्ग निरीक्षण करून पक्षी, फुले, प्राणी आणि हवामान यांची माहिती मिळवावी. ७. अक्षर सुधारणा⁕ सुंदर लेखनाचा सराव करावा. विविध भाषांमध्ये लेखन करण्याचा प्रयत्न करावा. हस्ताक्षर सुधारण्यासाठी नियमित लिखाण करावे. ८. शैक्षणिक सहल⁕ ऐतिहासिक स्थळे, विज्ञान केंद्रे, वस्तुसंग्रहालये यांना भेट द्यावी. नव्या जागा पाहून त्यांच्याबद्दल माहिती गोळा करावी. शैक्षणिक सहलीमुळे इतिहास, विज्ञान आणि संस्कृतीविषयी ज्ञान वाढते. ९. उन्हाळी शिबिर⁕ शिबिरांमध्ये भाग घेऊन विविध कौशल्ये आत्मसात करावीत. नेचर कॅम्प, साहसी खेळ, कला व विज्ञान शिबिरांमध्ये सहभागी व्हावे. या शिबिरांमुळे आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते. सुट्टीतील या उपक्रमांचे महत्त्व या सर्व गोष्टींमुळे सुट्टी केवळ मनोरंजनासाठी नसून, व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक संधी ठरते. वेळेचा सदुपयोग केल्याने नवीन कौशल्ये शिकता येतात, आरोग्य सुधारते आणि आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे परीक्षा संपल्यानंतर सुट्टीचा योग्य उपयोग करून स्वतःला अधिक सक्षम बनवा !

**लेखक कलाशिक्षक.**
**मनोहर बाविस्कर.**
**हिमालय हायस्कूल बोरिवली पश्चिम**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## देशमाने येथील मराठा विद्या प्रसारकच्या जनता विद्यालयाचे उत्कृष्ट यश


गौरव संजय राठोड | साहिल पुंजाराम खडके | दुर्गा शिवनाथ दुघड | स्नेहल बाळासाहेब गांगुर्डे | ऋतुजा बापू खडके

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** देशमाने येथील मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या जनता महाविद्यालयात इयत्ता १० वी मार्च २०२५ चा निकाल जाहीर झाला असून विद्यालयाचा शेकडा निकाल ९६.१५ टक्के लागला असून, परीक्षेला एकूण प्रविष्ट विद्यार्थी ५२, पास विद्यार्थी ५०, मार्च २०२५च्या परीक्षेत विद्यालयातील पहिले ५ विद्यार्थी

१) दुर्गा शिवनाथ दुघड ८४.०० % २) साहिल पुंजाराम खडके ८२.६०% ३) गौरव संजय राठोड ८२.२०% ४) स्नेहल बाळासाहेब गांगुर्डे ८१.४० % ५) ऋतुजा बापू खडके ८०.८०% विद्यालयात गणित व विज्ञान या विषयाचा १०० टक्के निकाल लागला. गुणवंत विद्यार्थ्यांचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, शालेय समितीचे अध्यक्ष कैलास जगताप व सर्व शालेय समिती सदस्य, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.भास्कर ढोके, मुख्याध्यापक एस.बी गायकवाड , शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## हाजराबी मोहंमद कुरेशी यांचे वृद्धापकाळाने निधन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१३, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर दि.१३ मे २०२५ रोजी महाबळेश्वर येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक पै.मोहंमद इमाम कुरेशी यांच्या पत्नी हाजराबी मोहंमद कुरेशी (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्या महाबळेश्वर पालिकेचे सेवानिवृत्त स्वच्छता निरीक्षक रफिकभाई कुरेशी, लियाकत कुरेशी यांच्या मातोश्री तसेच पत्रकार रियाज मुजावर , इम्रान कुरेशी यांच्या आजी होत त्यांच्या पश्चात मुले, मुली , नातवंडे असा परिवार आहे

## चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हस्ते मृदंगाचार्य महादेव सस्ते यांचा गौरव

### धुंडा महाराज सेवा प्रतिष्ठान धाराशिव सेवाकार्य उपक्रम




**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१५, धाराशिव :** धाराशिव तालुक्यातील येडशी येथील श्री संत वै .रामकृष्ण भाऊ ,भगवान भाऊ ,परमेश्वर महाराज मंदिरा आश्रमाचे धर्मकार्य सेवक व मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा ) सस्ते वारकरी सेवा मंडळ संचलित वारकरी शिक्षण संस्थेचे प्रमुख मृदंगाचार्य महादेव जालिंदर सस्ते (गुरुजी ) यांचा सन्मान श्री सदगुरु धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान धाराशिव यांच्यावतीने श्री परमपुज्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हस्ते गौरवपत्र शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. हा सन्मान सोहळा धाराशिव येथील राजासाब हॉटेल सांस्कृतिक सभागृहातील आयोजित प्रवचन माला सेवा कार्यात दि.१४ मे २०२५ रोजी संपन्न झाला . देगलूरकर घराणे हे एक वारकरी संप्रदायातील वैभवशाली घराणे म्हणून ओळखले जाते सामाजिक दृष्ट्या ही या घराण्यास अनन्य भावे महत्व आहे .अशा वैशिष्ट्यपूर्ण घराण्याचे परमपूज्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या शुभहस्ते हा सन्मान सोहळा मृदंगाचार्य महादेव जालिंदर सस्ते (गुरुजी ) यांना देण्यात आल्याने .वारकरी संप्रदाय मधून व ग्रामस्थ नागरिकांतून त्यांचे कौतुक व आनंद होत आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ह .भ.प. पद्मनाभ व्यास महाराज ,डॉ. अजित नायगावकर ,एस के कुलकर्णी ,गिरीधर कुलकर्णी , सुधाकर कुलकर्णी ,प्रभाकर चोराखळीकर, योगेशजी कुलकर्णी , आदि सेवक पदाधिकाऱ्यांच्या व्यवस्थापने खाली हा सोहळा संपन्न झाला यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## इंग्लंड दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा; ‘लेडी सेहवाग’ला मिळाली कमबॅकची संधी

**▪ पुणे : प्रतिनिधी**

भारतीय नियामक मंडळाने **(BCCI)** इंग्लंड विरुद्धच्या आगामी वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा केली आहे. भारतीय महिला संघ ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेसह इंग्लंड दौऱ्याची सुरुवात करणार आहे. त्यानंतर भारत इंग्लंड यांच्यात ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवण्यात येईल. टी २० मालिकेची सुरुवात २८ जून पासून होणार असून वनडे मालिकेतील पहिला सामना हा १६ जुलैला नियोजित आहेत. इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाचे नेतृत्व हे हरमनप्रीत कौरकडे असून स्मृती मानधना उपकर्णधार आहे. इंग्लंड दौऱ्यावर संघात जो सर्वात मोठा बदल झालाय तो म्हणजे लेडी सेहवाग अर्थात शफाली वर्माची भारतीय महिला संघात एन्ट्री झाली आहे. तिच्याशिवाय सयाली सतघरे हिलाही टी-२० मध्ये संधी देण्यात आली आहे. वनडेत श्री चरणी, शुची उपाध्याय, क्रांतीसह, अमनजोत कौर आणि स्नेह राणा यांना संधी मिळालीये. टी २० मालिकेची सुरुवात २८ जून पासून होणार असून वनडे मालिकेतील पहिला सामना हा १६ जुलैला नियोजित आहेत. भारतीय नियामक मंडळाने **(BCCI)** इंग्लंड विरुद्धच्या आगामी वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा केली आहे. भारतीय महिला संघ ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेसह इंग्लंड दौऱ्याची सुरुवात करणार आहे. त्यानंतर भारत इंग्लंड यांच्यात ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवण्यात येईल. टी २० मालिकेची सुरुवात २८ जून पासून होणार असून वनडे मालिकेतील पहिला सामना हा १६ जुलैला नियोजित आहेत. इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाचे नेतृत्व हे हरमनप्रीत कौरकडे असून स्मृती मानधना उपकर्णधार आहे. इंग्लंड दौऱ्यावर संघात जो सर्वात मोठा बदल झालाय तो म्हणजे लेडी सेहवाग अर्थात शफाली वर्माची भारतीय महिला संघात एन्ट्री झाली आहे.

# आई-वडिलांच्या कष्टाचं जाणलं मोल!

## रिया दणदणे हिची दहावीच्या परीक्षेत उज्वल कामगिरी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१५, गुहागर (निवोशी) :** बदलती शिक्षण व्यवस्था पालकांसह विध्यार्थ्यांना मोठे आव्हान निर्माण करीत आहे, दहावी उत्तीर्ण होणे ही प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्वपूर्ण पायरी समजली जाते, पुढे हीच पायरी विद्यार्थ्यांना भविष्यातील स्वप्नांकडे नेणारा दिशादर्शक मार्ग ठरतो,

गुहागर तालुक्यातील निवोशी (दणदणेवाडी) येथील काबाडकष्ट करणाऱ्या कुटुंबातील मुलीने प्रतिकूल परिस्थितीतही दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. रयत शिक्षण संस्थेचे श्रीमती रखुमाई पांडुरंग पालशेतकर विद्यालय पालशेत ह्या शाळेची विद्यार्थ्यांनी कु.रिया रघुनाथ दणदणे ह्या मुलीने नुकताच निकाल लागलेल्या दहावीच्या परीक्षेत ८४% ने पास होऊन आपल्या पालकांच्या कष्टाचे सार्थक केले. घरची परिस्थिती बेताची वडील मुबंईत रोजनदारीवर कामाला असून आई रुपाली आपल्या दोन लेकरांसह गावीच राहत शेती व मोलमजुरी करून आपलं उदरनिर्वाह करत आहे.

कु.रियाने आपल्या पालकांच्या कष्टाचे चीज करण्याचे स्वप्न उराशी बाळगून, बिकट परिस्थितीशी दोन



हात करीत नियमित अभ्यास व जिद्द चिकाटीच्या जोरावर दहावीच्या परीक्षेत केलेल्या उज्वल कामगिरीचे प्रतिबिंब दहावीच्या निकालातून मंगळवारी दिसले. हे यश तिच्या मेहनतीचे आहेच. मात्र तिच्या आई वडिलांनी केलेल्या त्याग,अथक परिश्रम व पाठिंबा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. अक्षराज प्रतिनिधीशी बोलताना कु.रिया हिने सांगितले आपल्या यशात आई- वडील, मामा-मामी,शिक्षक यांचा मोठा वाटा आहे,भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात करियर करण्याचे तिचे स्वप्न आहे. कु.रिया हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन सह कौतुक होत आहे.

# इयत्ता दहावी मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१४, पानगाव (लातूर) :** महाराष्ट्र राज्य मध्यमिक शिक्षण मंडळ च्या इयत्ता दहावी बोर्डचा निकाल लागला असून रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील बरेच विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. ग्रामीण भागातील मुलं सुद्धा कुठे कमी पडत नाहीत हे दाखवून दिले. ग्रामीण भागात सुविधा आभाव असतो. त्यावर मात करीत विद्यार्थीनी घवघवीत यश संपादन केले. आशा विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाब्बास कीची थाप पडणे सुद्धा महत्वाच आहे. करण दहावी चे वर्ष हे विध्यार्थी च्या आयुष्यातले महत्वाचे व बोर्ड च्या परीक्षा चे पहिले वर्ष असते. त्यामुळे या परीक्षा पास होण्याचे विद्यार्थी वर दर्पण असते. आशा सर्व गोष्टीवर मात करून हे विद्यार्थी नी यश संपादन केले



आहे.

संत ज्ञानेश्वर कोचिंग क्लासेस पानगाव यांच्या वतीने सुद्धा यशस्वी विध्यार्थी व पालक यांचा सत्कार करण्यात आला या

आशा यशस्वी विध्यार्थी चे कृषि उत्पन्न समितीचे माजी सभापती चंद्रचूड चव्हाण यांनी सत्कार केला व या यशस्वी विध्यार्थी च्या पाठीवर कौतुका ची थाप दिली पुढील उज्वल भविष्या साठी शुभेच्छा दिल्या. व विध्यार्थी पालक व त्याचे शिक्षकाचा सुद्धा सत्कार करून त्याचे मनोबल वाढवले. या वेळी उपस्थित यशस्वी विध्यार्थी व त्याचे पालक सोमेश्वरी शिवानंद बावगे ९७ %घेऊन केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला माऊली इंग्लिश स्कुल पानगाव येथील विध्यार्थी आहे समृद्धी अनंतराम साखरे ९३.६०, (सरस्वती विद्यालय पानगाव येथील विधार्थी )श्वेता वैजनाथ फड ९४.४०%, विष्णू बालाजी फड, ९१%, पंकज्ञा दत्ता करपे ८८%, वैभव दत्तात्रय फड ८५.८० %, सुमित सिद्राम माने ८५. ४०%, तसेच इयत्ता आठवी च्या स्कॉलशिप च्या परीक्षा मध्ये प्रणाली प्रदीप सूर्यवंशी या विध्यार्थीनीने एकूण ३०० पैकी १८४ एवढे मार्क घेऊन घवघवीत यश संपादन केल्या मुळे या सुद्धा विधार्थी चा सत्कार करण्यात आला.

# ढोकेश्वर विद्यालयाची यशस्वी घोडदौड कायम सेमी इंग्लिश चा निकाल १०० टक्के।

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९५.३६ टक्के लागला आहे. तर सेमी इंग्लिश चा निकाल १०० टक्के लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस. सी बोर्ड परीक्षेसाठी विद्यालयातून १५१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यावर्षी देखील उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. ३३ विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणी मध्ये, ५० विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये, ३९ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मध्ये तर १० विद्यार्थी तृतीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.



विद्यालयात गुणांनुक्रमे प्रथम आलेले पाच विद्यार्थी पुढीलप्रमाणे धुमाळ ज्ञानदा उत्तम व श्लोक भाऊसाहेब नरवडे ( ९५.६ टक्के ) हे दोन विद्यार्थी संयुक्तिक रित्या प्रथम आले. तनुश्री दत्तात्रय चौरे व ओमकार संतोष नरसाळे ( ९५.२० टक्के ) हे दोन विद्यार्थी संयुक्तिक रित्या द्वितीय आले. सायली दत्ता माकरे ( ९३ टक्के ) तृतीय, नवदीप उमाजी धरम ( ९२.८०टक्के ) चतुर्थ तर साई अतुल सैद ( ९१.६०टक्के ) पाचवा आला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना माजी प्राचार्य सुनिल वाव्हळ, प्रभारी प्राचार्य बाळासाहेब खिलारी, ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे (गणित), रवींद्र ज्योतिक ( गणित ) रवींद्र मते (मराठी), संतोष इंगळे व वर्षा भोंडवे (हिंदी), बाबासाहेब जाधव (इंग्रजी), सोनल रोहकले (विज्ञान), संदीप महांडुळे (सामाजिकशास्त्र) व विद्यालयातील इतर सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम आण्णा खिलारी सर यांच्या हस्ते कारण्यात आला. या प्रसंगी पालक भाऊसाहेब नरवडे, साईनाथ शेळके, अतुल सैद, सुशांत खेडकर बाळासाहेब झावरे, नामदेव भिटे, दत्तात्रय चौरे, उत्तम धुमाळ, पुष्पा धुमाळ, लता चौरे, निता धरम, रोहिणी नरसाळे, अमोल गोरे, नारायण हरेल सर्व यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयातील इयत्ता १० वी च्या या सर्व यशस्वी विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व प्रशासनाचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेकजी भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतजी वाघ साहेब, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे व संस्थेचे जेष्ठ विश्वस्त व माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे ज्येष्ठ विश्वस्त जी.डी.खानदेशे, सिताराम खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजीकाका खिलारी, शाळा समितीचे सदस्य बबनराव पायमोडे, टाकळी ढोकेश्वर परिसरातील पालकांनी अभिनंदन केले.

# मूळव्याध भगंदर होण्याचे लक्षणे !

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आजारांची सुरवात आपल्याला ओळखता आली पाहिजे. बरेचदा अस होत की आपल्याला आजाराची ओळख नसते आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करून आजार तसाच वाढू देतो ज्या मुळे गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. सुरवातीला आपण आजार ओळखून त्याची चिकित्सा केली तर तो भविष्या मध्ये आपल्याला त्रास देणार नाही याची मात्र खात्री आहे.

सदर लेखात आपण बघणार अहो की कोण कोणते लक्षण आपल्याला बघायला मिळतात वेगवेगळ्या आजारानं मध्ये. मुळात याचे भरपूर प्रकार आहेत परंतु जास्त प्रमाणात आपल्याला तीन प्रकार जास्त बघायला मिळतात एक म्हणजे फिशर यालाच संस्कृत भाषेत परिकर्तिका असे म्हणतात. या मधे मल (गुदमार्ग)मार्गावर चीर पडल्या जाते ज्या मुळे मलविसर्जन च्या वेळी जळजळ होणे रक्तस्राव होणे मल ला लागून रक्त येणे असे काही लक्षण दिसून येतात. याचे मुख्य कारण मलअवरोध व बध्दकोष्ठ आहे. मल थांबून ठेवणे किंवा पोट साफ न होणे यामुळे हे वाढत जाते. दुसरा म्हणजे मूळव्याध ज्या मध्ये मल मार्गावर आपल्याला मास आल्या सारखे वाटते. मल विसर्जन च्या वेळी जाणवते जास्त मोठे असल्यास रक्तस्त्राव होतो. तिसरे म्हणजे भगंदर. हा दीर्घकाळ असणारा आजार आहे. या मध्ये गुदमार्ग सोडून त्याच्या अवतीभवती गाठ तयार होते जी कालांतराने व्रण रूप धारण करते ज्या मध्ये पस रक्रस्रावच समावेश असतो. ही आतमध्ये मार्ग तयार करत जाते ज्या मुळे भगंदर तयार होते. याचे निदान जर सुरवातीला नाही लागले तर हा मार्ग पुन्हा वेगवेगळे मार्ग तयार करतो. एका वेळीस मोठ मोठे अनेक भगंदर तयार होतात. हा त्रास असहनीय असतो . ज्या मध्ये रुग्णाला अतिशय जास्त पिडा असते. त्यामुळे अशी वेळ न यावी म्हणून आधीच यामध्ये काहीही लक्षण तुम्हाला आढळल्यास लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि खूप वेळे पर्यंत वाट न बघता याची तपासणी करावी .

**डॉ. तेजश्री बनसोड**
**(एम.एस.शल्यतंत्र)**

